'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

आदिवासी मिथ (Myth) कथांचा अभ्यास

डॉअंजली मस्करेन्हस.
एसकरंदीकर महाविद्यालय डहाणू.आर.
जि पालघर.
मो– ७७५७८४६०१६.न. ९९७५२९०३७१
ई – मेल –anjaliromeo@gmail.com

आदिवासी दीसकथा या मिथ (Myth) कथा असून सृष्टीची उत्पत्ती, रचना, विनाश, दैवी घटना यांचे वर्णन आहे. आदिवासी दैवतकथांचे जागतिक कथांशी साम्य आढळते. तसेच वैज्ञानिक सत्य, उत्क्रांती तत्वाशी साम्य आढळते. आदिवासींच्या दीसकथा या मृत्यूकथांचे मिथ असून आत्मा नवा जन्म घेतो असे मृत्यू हे पुनर्जन्माचे प्रतीक मानले जाते. मिथ कथा या विधिनाट्याशी (कृतीशी) बांधलेल्या असून या कथांना स्वतंत्र स्थान नाही. या कथा गद्यपद्य मिश्रीत असून, डहाक आणि टाळ या वाद्यांच्या सहाय्याने कथन केल्या जातात. कथानिवेदक डहाक्या यांच्या शैलीनुसार कथानिवेदनात बदल होतात. अन्यथा कथांचे खंड समान असतात. या कथांमधून अद्‌भुत गूढ भावविश्व आदिबंध, आदिबंधात्मक प्रतिमांतून साकार होत असते.

कथाकथन परंपरा :-

भारतीय समाज हा कथाप्रिय असून भारतात लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. भारतात सामान्य लोकांना कथारुपाने धार्मिक ज्ञान त्याचप्रमाणे ऐतिहासिक आणि विविध ज्ञान देण्यासाठी ऋत्विज कथा सांगत असत. लोककथा सांगण्यांऱ्याची परंपरा भारतात वेदकाळापासून उदयास आली. त्या काळात 'आरव्यानविद् 'नामक कथकांचा एक स्वतंत्र वर्गच असल्याचे आपल्याला दिसते. महीदास ऐतरेय यांनी सोमयागाच्या विविध कृतींची माहिती देताना अनेक कथा सांगितल्याचा उल्लेख आहे. ऋषिमुनींच्या काळातच व्यास, सौती, शौनक, असे तीन सुप्रसिध्द कथाकथक उद्यास आले. 'सूतोवाच' असा एक 'प्रारंभिक' या अर्थाचा वाक्यप्रचारही पडला आहे. तो या कथाकथनाचेच 'सूतोवाच' करणारा यालाच 'कथक्कड' उर्फ 'काथिक' अशी संज्ञा आहे.

मध्ययुगीन लोकसाहित्यात व्यासाचा पुत्र शुक हा पुराणकथा सांगणारा मानला जातो. तो पोपट होता ही कल्पना लोकसाहित्यात आहे. सिंहासनबत्तीशी मधील कथा पोपटाने सांगितल्या आहेत. गोंडाच्या उत्पत्तिकथेत बीजमंत्राची कहाणी पोपटाने एकल्याचे म्हटले आहे. पुराणासंबंधी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांचे मत असे आहे की, वैदिक काळात यज्ञसंस्थेची वाढ होत असतानाच राजवंशांच्या कथा तसेच राजांच्या चरित्रकथांचे संग्रह होऊ लागले. त्यालाच 'आदिपुराण' असे म्हणतात. महाभारतातील अनेक कथोपकथा व्यासाने आदिपुराणातून घेतल्याचे म्हटले आहे. पुराण सांगणाऱ्या सूत, माधव व बंदी या शूद्र जमातींनी मुळात पुराणांची रचना आणि पुराणकथांचा पिढ्यानुपिढ्या संग्रह करुन पुराणांची वाढ केली आहे. या लौकिक पुराणकथांना वैदिक परंपरेतील वाङ्मयात स्थान मिळाले आणि वैदिक व अवैदिक दैवतकथांचे मिश्रण झाले असे म्हणता येते. अनेक उत्पत्तिकथा आणि व्रतकथा परंपरेने जातिकथेत सांगितल्या जातात. काही जमाती अपरंपरेने देवादिकांच्या कथा सांगण्याचेच काम करतात. आसाडी, माळ, बबनीडू, या जमातीचे लोक अनुक्रमे पोलेरम्मा, अंकम्मा, मातंगी या देवतांच्या कथा सांगतात. तसेच कोम्मु बडलु या देवतांच्या कथा सांगतात. हे मांडिया जातीतील लोक धनगरांचे पुराण सांगतात असे एल्मोर यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रात कुंभार जातीचे लोक मर्तिकाची गाणी म्हणतात. त्यातील कौरवपांडवांच्या कथा स्वतंत्र असतात. बंजारा या जमातीत तर लोककथांचा संबंध एखाद्या विधीशी जोडलेला असतो. बंजारा जमातीत लग्नविधीत भोजनप्रसंगी वधुवराकडील लोकांनी जमातीत लग्नविधीत कथा सांगवयाची प्रथा दिसते. मेंढ्या जोशी या जातीत लोककथांचा संबंध मृत्युविधीशी जोडलेला आढळतो.

पालघर, ठाणे जिल्ह्यातील वाडा, डहाणू, तलासरी, मोखाडा, या तालुक्यांमधील गावात वारली, मल्हार कोळी, कोकणा या जमाती मधील स्त्री, पुरुष कथाकथनकार दैवतकथा, अदभुतकथा, दंतकथा, नीतीकथा, वीरकथा, हास्यकथा, व्रतकथा, पुराणकथा, लोकोक्तिकथा इत्यादी प्रकारामधील कथा सादर करतात. या शोधनिबंधात दैवत कथा संकलन करुन ध्वनिमुद्रण करुन त्यांचा अभ्यास केला आहे.

आदिवासी लोककथांच्या अभ्यासासाठी आदिबंधात्मक समीक्षेचे उपयोजन केले आहे. हा सिद्धान्त कार्ल गुस्टाफ युंग (१८७५-१९६१) या स्विस मानसशास्त्राच्या नेणीवेनिष्ठ मानसशास्त्राच्या (डेप्थ सायकॉलॉजी) परंपरेतून

साहित्यसमीक्षेत आलेला आहे. मानसशास्त्रीय दृष्ट्या 'आर्किटाईप' म्हणजे मनोवृत्तीचा मूल आकृतिबंध या आकृतिबंधासाठी युंगने १९१९ साली 'आर्किटाइप (Archetype) ही संज्ञा प्रथम वापरली.

युंगची आदिबंधाची संकल्पना मानवी मनाशी निगडित आहे. त्याच्या मते मानवी मनाचा व्यापार तीन स्तरांवरून चालत असतो. १) जाणिवेचा स्तर (द कॉन्शसनेस), २)व्यक्तिगत नेणिवेचा स्तर (पर्सनल अनकॉन्शस), ३) सामूहिक नेणिवेचा स्तर, (द कलेक्टिव्ह अनकॉन्शस) या तीन स्तरांच्या देवघेवीतून मानवी मनाचे समग्र रूप साकार होते. या तीन स्तरांपैकी सामूहिक नेणिवेच्या अंतर्भागात मानवजातीच्या अनेक पिढ्यांचे असंख्य अनुभवविशेष साठलेले असतात. ही सामूहिक नेणीव म्हणजे आदिमानवाच्या काळापासून साठत आलेल्या अवशेषरूप वा संस्काररूप अनुभवांचा एक संचय होय. या नेणीव कोशातील (सामूहिक असंज्ञेतील) अंगांना व मूलभूत जीवनप्रवृत्तींना एका विशिष्ट प्रतिमेत संघटित व साकार करणाऱ्या आदिम संघटकाला वा आकृतिबंधाला 'आदिबंध' असे म्हटले जाते. या आदिबंधांना मूर्त करणाऱ्या प्रतिमा म्हणजे 'आदिबंधरूप प्रतिमा' (आर्किटायपल इमेज) होत. त्यांचे स्वरूप बरेचसे प्राक्कथात्मक असते. त्या आदिबंधाच्या आविष्कारक असतात. युंगने प्रामुख्याने अनिमा – अनिमस, ज्ञानवृद्ध (वाइज ओल्ड मॅन), आदिमाता, पिता, छाया (शॅडो), 'स्व' (सेल्फ) हे आदिबंध मानले आहेत. पुरूष – मनातील स्त्री प्रतिमेला 'अनिमा' असे म्हणतात, तर स्त्री मनातील पुरूषप्रतिमेला 'अनिमस' असे म्हणतात. ज्ञानी द्रष्टा आदि गुणांचे प्रतीक असलेला मार्गदर्शक पितृप्रतिमेला 'ज्ञानवृद्धाचा आदिबंध' असे म्हणतात. या आदिबंधाचा शोध आदिवासी प्राक्कथा (Myth) (दैवतकथा) मधून केला आहे. मिथ म्हणजे प्राचीनतम कथा. मिथ कथांमधून मानवी जीवनाचा, जीवनातील अनेकविध मूलभूत गोष्टींचा, संबंधांचा विश्वरचनेचा शोध घेण्याचा, अर्थ लावण्याचा वा संगती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला असतो. आदिमानवाच्या धार्मिक रूढी आणि विधी यासंबंधीच्या कारणांचे उत्तर प्राक्कथांमध्ये आढळते. सृष्टीच्या महान शक्तींशी या कथा संबध्द असल्यामुळे त्यांत अद्‌भुततेचे चित्रण असते. या कथेत सृष्टीची उत्पत्ती, रचना, विनाश, दैवी घटना, देवता यांची वर्णने असतात.

मी संकलीत केलेल्या आदिवासी 'दीस कथा' या त्यांच्या धार्मिकतेचा एक भाग आहेत.

आदिवासी दीस कथा :-

या त्यांच्या धार्मिकतेचा एक भाग आहेत. मृत्यूसंस्कारा झाल्यानंतर तेराव्या दिवशी वा मर्गशीर्ष वा माघ महिन्यात विधी करण्याची प्रथा आहे. भगत (डहाक्या) आणि त्याचे दोन सहाय्यक हे डहाक व टाळ वा वाद्यांच्या तालावर संपूर्ण रात्रभर कथाकथन करतात. या कथा सहा खंडामध्ये असून, मौखिक परंपरेने कथन केल्या जातात. या कथा दैवतकथा (Myths) वा उत्पत्तिकथा या प्रकारातील आहेत.

दैवतकथांमधील आदिबंध :-

'धरणीचा खंड' या दीर्घ कथेमध्ये महादेव व त्यांची पत्नी गंगागौरी यांनी मातीच्या गोळ्यापासून पृथ्वी, आकाश, चंद्र, सूर्य, चांदण्या, डोंगर, दऱ्या, वारा, पाऊस, दिवस – रात्र यांची निर्मिती केली. त्यामुळे महादेव हा आदिपिता व गंगागौरी ही आदिमातेचा (महामाता) आदिबंध आहे.

गंगागौरीने महादेवाला पृथ्वीवर माणूस बनविण्यास सांगितले. महादेवाने पृथ्वीच्या मातीच्या दोन मूर्ती घडविल्या व दोघांनी त्यामध्ये वारा फुंकला. (जीव भरला) काही काळांनी त्यांचा विवाह करून दिला. त्यांच्या प्रमाणेच गायी, गुरे, किटक – मुंग्या, पाखरे यांचेपण लग्न लावले. त्यानंतर पृथ्वीवर लोकसंख्या वाढली. प्राणी, पक्षी, गुरे – ढोरे, झाडे, जंगले, जीवजंतू यांची वाढ झाली. माणूस पापी झाला. पृथ्वीला मानवाचा भार असह्य झाला म्हणून ती रडत – रडत महादेवाकडे गेली. तिचे दु:ख ऐकून महादेवाने मानवाला सांगितले, "तुझी आई पृथ्वी आहे. तू मरेपर्यंत तुझे नाते पृथ्वीशी आहे. तू एक मातीचा कण आहेस. पण तरीही देवाचा माणूस पूर्ण बिघडून गेला. त्यामुळे देवाचे राज्य गेले व माणसाचे राज्य आले. माणसाचे पापी राज्य नष्ट करण्यासाठी महादेवाने पृथ्वीवर महाप्रलय घडविला व पृथ्वी वरील सजीव सृष्टी, प्राणी, मानव नष्ट केले."

ही पृथ्वीच्या लयाची कथा ही प्राक्कथा आहे. या कथा सामूहिक अचेतनातून उदित होतात. मनाचा हा स्तर म्हणजे लाखो वर्षांच्या साठत गेलेल्या मानवी अनुभवांचा प्रचंड खजिना होय. तो इतिहासापूर्व घटनांचा प्रतिध्वनी होय. त्यात एकेका शतकाने घातलेली भर अगदी नगण्य असते. त्यामुळे त्यात फारसा बदल होत नाही. शेवटी हा मानवी मेंदूत

व सहानुकंपनसील मज्जासंस्थेत सुप्त असलेला विश्वप्रक्रियांचा ठेवा असतो. ही एक कळातील वा चिरंतन अशी विश्व प्रतिमा असते.

'धरणी खंडाच्या' दुसऱ्या कथेत धरणीला वाढणाऱ्या लोकसंख्येचा भार असह्य झाल्यामुळे ती रडत – रडत महादेवाकडे गेली. तिचे दु:ख दूर करण्यासाठी सर्व देवांची सभा भरली व सर्व देवांच्या सभेत सर्वानुमते निर्णय देण्यात आला की "पृथ्वीवरील पहिले मरण पांडूदेवाला द्यावे." हे कार्य त्याचीच बहीण गंगागौरी हिच्याकडे देण्यात येते. त्यासाठी गंगागौरी बोरामध्ये एका किडीची निर्मिती करून ते बोर भावाला खायला देते. किडीचे रूपांतर सर्पामध्ये होऊन सर्पदंशाने पंडूदेवाचा मृत्यू होतो. हा पृथ्वीवरील पहिला मृत्यू होय. त्यामुळे मृत्यूसंस्काराची निर्मिती करणारी म्हणून गंगागौरी ही सुमाता आणि रूद्रमाता यांचा आदिबंध ठरते.

'किरणाच्या खंडात' सूर्याची पहिली किरणे आकाशातून प्रवास करत सात राने, सात समुद्र, सात खंड, सात नद्या, गाव गावाच्या वेशी असा प्रवास करत मृत्यू झालेल्या माणसाच्या दारात मृत्यूचा घोडा घेऊन येतात. त्यानंतर मृत्यू झालेल्या माणसाची चरित्रकथा सुरू करतात. तो जन्माचा प्रवास मातेची गर्भधारणा → जन्म → बालपण लग्न → जीवन कार्य → मृत्यू यांचे धावते वर्णन करून शेवटी मेलेल्या माणसाचा आत्मा म्हणजे 'किरण' घेऊन जातो. असा आकाशातील हा प्रकाश किरण नव्या आशेचा मृत्यूवर मात करणाऱ्या नवजीवनाची जाणीव ध्वनीत करतो.

'भक्ती खंडात' मृताच्या घड्याचा बारावर्षाचा प्रवास वर्णन केला जातो. मातीचा घडा, डोंगर, दऱ्या, गाव, पाडे, गावदेव अशा विविध स्थानांना भेट देत. मृतात्म्याच्या घरा पर्यंत येतो. हा घडा महादेवाने फोडून टाकला असे वर्णन केले जाते. आत्म्याला मुक्ती देणारा महादेव या प्राक्कथेत येतो. मृतात्म्याच्या नातलगांशी असलेले त्याचे नातेसंबंध तोडून त्यांच्या कुटुंबातील मृतात्म्यांशी त्याचा संबंध जोडला जातो.

या दीस विधी मध्ये कुंभाचे पूजन केले जाते. तसेच या प्राक्कथांमध्ये मृताचा घडा, डोंगर, दऱ्या, गाव, प्रदेश, गावदेवीचे स्थळ (प्रार्थनेचे स्थळ) ही मातेच्या आदिबंधाशी निगडीत आहेत. गर्भाकडून गर्भाकडे असा प्रवास होतो. या प्राक्कथेची सुरूवात चरित्र नायकाच्या प्रवासाने मातेच्या गर्भापासून म्हणजे जन्म झाल्यापासून त्या नंतरचे सर्व टप्पे वर्णन केले जातात. संज्ञेच्या विकासक्रमात प्रत्येक मुलाला आई वडिलांचा प्रभावक्षेत्रातून, कोशकिटकाप्रमाणे बाहेर यावेच लगते. त्या कोशाचा भेद करावाच लागतो. आयुष्याची सुख – दु:ख भोगत त्याचा जेव्हा मृत्यू होतो, मृत्यू म्हणजे आपल्या मातेकडे परत जाणे, पुन्हा जन्मण्यासाठी गर्भकोशात विलीन होणे, अशा या प्राक्कथेतून संज्ञेचा आदिबंध आविष्कृत झाल्याचे दिसते.

'भक्तीच्या खंडा' मध्ये दीस करण्यासाठी विविध गावात गुरूचा / भगताचा शोध घेतला जातो. कारण या विधीचा तो मार्गदर्शक असतो. हा वृद्ध आप्ताच्या आदिबंधात युंगच्या वाइज ओल्डमॅनच्या प्रतिमेत अवतिर्ण होतो. त्यांच्या कुटुंबात पूर्वी मरण पावलेल्या पूर्वजांशी त्यांचे नाते बांधून देतो. अंगात वारे आलेला भगत म्हणजे मेलेल्या माणसाचा आत्मा आलेला भगत सर्व नातलगांना आलिंगन देतो हे डहाक व टाळांच्या तालावरील भाराऊन गेलेले वातावरण असते. हे सारे वातावरण गूढतेचे वलय निर्माण करते. जाणिवेतून नेणिवेमध्ये घेऊन जाणारा हा विधी असतो. या दीसकथा ऐकणारा श्रोता, प्रेक्षक या कथानकाशी एकरूप होऊन आपले प्रतीकात्मक मरण अनुभवत असतो. मृत्यू हा साऱ्या आप्तस्वकीयांचा निरोप घेऊन स्वगृही परतण्याचा सोहोळा बनतो. शेवटी मृतात्म्यासाठी ठेवलेला मातीचा घडा फोडला जातो. तेव्हा आत्म्याला चिरशांती मिळते. पुन्हा जन्म घेण्यासाठी महामाता त्याला आपल्या कोशात सामावून घेते. त्यामूळे मृत्यू म्हणजे आपल्या मातेकडे परत जाणे अशा या प्राक्कथात्मक निर्मितीतून संज्ञेचा आदिबंध आविष्कृत होतो.

दीस कथांमध्ये पृथ्वीवर जीवसृष्टी कशी जन्माला आली त्याचे अनेक संदर्भ पुन:पुन: कथन केले जातात. एका मध्यरात्री बरोबर बारा वाजता आकाशातून बालरूपातील सर्प (दिवड) पृथ्वीवर पडला हा पृथ्वीवरील पहिला सजीव प्राणी आहे. असा कथाभाग येतो. तसेच महादेवाच्या घामामधून पृथ्वीवर पाण्याचे तळे (तलाव) तयार झाले. त्यामध्ये कंद व पाणसर्प प्रथम जन्माला आले. कंदामधून एक सुंदर वेल वाढू लागली. ही वेल म्हणजे सुंदर नार होय. या वेलीवर तीन फुले फुलली या फुलांशी एका पक्षाने संभोग केला. यामुळे पृथ्वीवर प्रथम पाप जन्माला आले. अशाप्रकारे भगत हे कथानक दिवास्वप्ना सारखे वा साक्षात्कारी अनुभवा सारखे कथन करत असतो. हे सामूहिक अबोध मनातील अनुभव वंशपरंपरेने व्यक्त होताना दिसतात.

या कथांमध्ये पृथ्वी, तलाव, सर्प, जमीन, घर, गाव, डोंगर – दऱ्या, कमळ, फूल, वेल, समुद्र या सारख्या प्रतिकांद्वारे कथानक मांडले जाते. या प्राक्कथा मातेचा आदिबंध व्यक्त करतात. या प्राक्कथा म्हणजे आदिवासींच्या सामूहिक नेणीवेतील सांस्कृतिक विश्व होय. या अ संज्ञेत आदिबंधाबरोबरच त्यांच्या मूलभूत जीवनप्रवृत्ती वसत असतात. हे आदिबंध या मूलप्रवृत्तीचे वाहक व संघटक असतात. या दीस कथामिथातून मरण ही मूलप्रवृत्ती व्यक्त होते. म्हणून त्या मृत्यूच्या प्राक्कथा (मिथ) आहेत. आदिवासी संस्कृती मध्ये मृत्यू झाल्यानंतर एका टोपली खाली ताटा मध्ये पीठ पसरवून

ठेवले जाते. त्यावर पडलेले ठसे ओळखून ती व्यक्ती कोणता पुनर्जन्म घेणारे हे सांगितले जाते. त्यामुळे कथामिथांतून मृत्यच्या दु:खाची, निराशेची भावना व्यक्त होत असली, तरी त्या मधून नव्या आशेची व प्रकाशाची जाणीव ध्वनित झालेली दिसते.

समारोप : आजच्या काळात आदिवासी दैवतकथा कथनकारांचे प्रमाण कमी झालेले आहे. आज अस्तंगत होऊ लागलेल्या लोकसाहित्याचे संकलन, जतन, संवर्धन, संशोधन करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष :

१) आदिवासी दीसकथा या मिथ (Myth) कथा असून सृष्टीची उत्पत्ती, रचना, विनाश, दैवी घटना यांचे वर्णन आहे.
२) अभ्यासलेल्या आदिवासी दैवतकथांचे जागतिक कथांशी साम्य आढळते. तसेच वैज्ञानिक सत्य, उत्क्रांती तत्वाशी साम्य आढळते.
३) आदिवासींच्या दीसकथा या मृत्यूकथांचे मिथ असून आत्मा नवा जन्म घेतो असे मृत्यू हे पुनर्जन्माचे प्रतीक मानले जाते.
४) मिथ कथा या विधिनाट्याशी (कृतीशी) बांधलेल्या असून या कथांना स्वतंत्र स्थान नाही.
५) या कथा गद्यपद्य मिश्रीत असून, डहाक आणि टाळ या वाद्यांच्या सहाय्याने कथन केल्या जातात.
६) कथानिवेदक डहाक्या यांच्या शैलीनुसार कथानिवेदनात बदल होतात. अन्यथा कथांचे खंड समान असतात.
७) या कथांमधून अद्‌भुत गूढ भावविश्व आदिबंध, आदिबंधात्मक प्रतिमांतून साकार होत असते.

'दीस कथा' संकलन, लेखन – डॉ.अंजली मस्करेन्हस

कथानिवेदक (भगत) -

१) श्री.हाल्या बेंड्या खरपड्या – मु.पो.नेटाळी, जि.पालघर
२) जमना वरठा - मु.पो.गोवाडे, जि.पालघर
३) रामा लक्ष्मण वरठा – गंजाड, जि.पालघर

शोधनिबंध लेखन - डॉ.अंजली मस्करेन्हस – एस.आर.करंदीकर महाविद्यालय डहाणू

संदर्भ ग्रंथ -

१) आदिबंधात्मक समीक्षा – डॉ.म.सु.पाटील
२) लोकसाहित्याचे स्वरूप - डॉ.प्रभाकर मांडे
३) आदिवासी कथा स्वरूप आणि समीक्षा